# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, : 07172-255800 ✍: 7447744100 (PRO)


## पोलीस वार्तापत्र

## एकतर्फी प्रेमातून तरुणीचा गळा चिरुन खून करणाऱ्या आरोपीला जन्मठेपाची शिक्षा: चंद्रपूर विशेष न्यायालयाचा निकाल

एकतर्फी प्रेमातून आणि लग्नास नकार दिल्यामुळे एका २७ वर्षीय तरुणीचा घरात घुसून गळा चिरून निर्घृण खून करणाऱ्या मुख्य आरोपीला चंद्रपूर येथील अतिरिक्त सत्र तथा विशेष न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती आय.ए.शेख यांनी जन्मठेप आणि १५,००० रुपये दंडाची कठोर शिक्षा सुनावली आहे.

यातील २७ वर्षीय मृतका हिचे २०१६ मध्ये लग्न झाले होते, परंतु पतीसोबत पटत नसल्याने ती एप्रिल २०२१ पासून नागभीड येथील आपल्या आईकडे राहत होती. पतीचा शेजारी राहणारा आरोपी विवेक ब्रह्मदास चौधरी वय २९ वर्ष हा तिचेवर एकतर्फी प्रेम करत होता. "तुझा नवरा तुला सोडून गेला आहे, तू माझ्याशी लग्न कर, नाहीतर मी तुला जिवंत मारून टाकेन, अशी धमकी देवुन दिनांक १४ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी १० ते १०:३० च्या सुमारास आरोपी विवेक चौधरी याने तिचे घरात बेकायदेशीर प्रवेश केला. आई घरात परत आली तेव्हा तिला आरोपी विवेक पूजाला मांडीवर घेऊन चाकूने तिचा गळा चिरताना रंगेहात दिसला. आईने आरडाओरड केली असता आरोपी पाठीमागच्या दारातून चाकू कमरेला खोचून पळून गेला. या हल्ल्यात पिडीतेचा जागीच मृत्यू झाला. यावरुन पोलीस स्टेशन नागभीड अपराध क्रमांक 309/2021 येथे आरोपीविरुध्द खुनाचा गुन्हा नोंदविण्यात येवुन त्याचा तपास श्री मिलींद शिंदे, तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपुरी यांनी करुन आरोपीविरुध्द भक्कम पुराव्यानिशी दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केले. विशेष सरकारी वकील श्रीमती एस.बी.रामटेके यांनी सरकार पक्षातर्फे एकूण १५ साक्षीदार तपासले. यामध्ये मृतकच्या आईची प्रत्यक्षदर्शी साक्ष, घटनास्थळावरून जप्त केलेला रक्ताळलेला चाकू, आणि प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (RFSL), नागपूर येथील डीएनए (DNA) अहवाल अत्यंत महत्त्वाचा ठरला. आरोपीच्या कपड्यांवरील आणि चाकूवरील रक्ताचे नमुने मृत मृतकच्या रक्ताशी तंतोतंत जुळले (DNA Match). या भक्कम वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने मुख्य आरोपीला दोषी धरले. दिनांक 19/06/2026 रोजी सदर प्रकरणाचा विशेष न्यायालय चंद्रपूर यांनी निर्णय देत आरोपी विवेक ब्रह्मदास चौधरी याला भारतीय दंड संहितेच्या (IPC) खालील कलमांखाली दोषी ठरवून शिक्षा सुनावली आहे.

- कलम ३०२ (खून):जन्मठेप (Rigorous Imprisonment for Life)
  आणि १५,००० रुपये दंड, दंड न भरल्यास १ वर्ष अतिरिक्त सश्रम कारावास.
- कलम ४५० (घरात घुसखोरी): ३ वर्षे सश्रम कारावास
  आणि १,००० रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सश्रम कारावास.
- कलम ३५४-डी (स्टॉकिंग/पाठलाग करणे): २ वर्षे सश्रम कारावास
  आणि १,००० रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सश्रम कारावास.
- कलम ५०६-भाग २ (गुन्हेगारी धमकी):३ वर्षे सश्रम कारावास
  आणि १,००० रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सश्रम कारावास.